# इतिहास

# Workbook

## घटकनिहाय सराव प्रश्नसंच

PRITHVI®
Publication

**इतिहास : Workbook**
**घटकनिहाय सराव प्रश्नसंच**

© **पृथ्वी पब्लिकेशन**

**प्रकाशक**
'पृथ्वी पब्लिकेशन', 1536,
सदाशिव पेठ, पुणे. 411030
**: 8390554161**

**मुखपृष्ठ मांडणी**
रसिका सागवेकर

**मांडणी**
अपूर्वा शिंदे

**मुद्रितशोधन**
प्रज्ञा भोसले

**वितरण व्यवस्था**
**: 8390554161**

**अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क**
**: 8390554161**
: admin@prithvi.net.in

**मूल्य**
₹ १४०/-

PRITHVI®
Publication

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | ब्रिटिश सत्तेची स्थापना : | |
| | शिक्षण, रेल्वे, वृत्तपत्रे, टपाल, जमीनसुधारणा, 1857 पूर्वीचे कायदे, प्रशासकीय रचना | 6 |
| | उत्तरे | 42 |
| 2. | सामाजिक सांस्कृतिक बदल : | |
| | महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक | 43 |
| | उत्तरे | 68 |
| 3. | सामाजिक आर्थिक जागृती : | |
| | भारतीय राष्ट्रवादाची निर्मिती व विकास, राष्ट्रीय सभा, मवाळ, जहाल | 69 |
| | उत्तरे | 102 |
| 4. | गांधी युग –1 – 1915–1935 : | |
| | सुरुवातीच्या चळवळी, असहकार, सविनय कायदेभंग | 103 |
| | उत्तरे | 114 |
| 5. | गांधीयुग – 1935–1948 : | |
| | स्वराज्य पक्ष, सायमन कमिशन, नेहरू अहवाल, साम्यवादी पार्टी, जस्टीज पार्टी | 115 |
| | उत्तरे | 133 |
| 6. | क्रांतिकारी गट | 134 |
| | उत्तरे | 145 |
| 7. | स्वांतत्र्योत्तर भारत | 146 |
| | उत्तरे | 158 |
| 8. | सांस्कृतिक वारसा | 159 |
| | उत्तरे | 170 |

# 2. सामाजिक सांस्कृतिक बदल – 1

**प्र.1. बरोबर विधाने ओळखा.**

**अ) महात्मा जोतिराव फुले यांच्यावर 'वज्रसूची' या अश्वघोषकृत ग्रंथाचा प्रभाव होता.**

**ब) महात्मा जोतिराव फुले यांच्यावर 'बिप्रमती' या कबीराच्या रचनेचा प्रभाव होता.**

**क)सत्यशोधक समाजात नव्याने दाखल होणाऱ्या सभासदास तळी उचलून त्यातील भंडारा–गुलाल कपाळास लावावा लागे.**

1) फक्त अ,ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

**प्र.2. प्रसिद्ध अशा 'रखमाबाई खटल्या'मधील रखमाबाईने आपली पुरोगामी बाजू खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्रातून मांडली होती ?**

1) 'टाइम्स ऑफ इंडिया' 2) 'इंदुप्रकाश' 3) 'द स्पेक्टेटर' 4) 'ज्ञानोदय'

**प्र.3. आपण (भारतीयांनी) इंग्रजांच्या कोणत्या गोष्टींचे अनुकरण करावे, असे गोपाळ गणेश आगरकरांचे मत होते ?**

**अ) कचेऱ्यांतून तत्परतेने व चोख काम करणे.** **ब) बेताबेताचे खाणे.**

**क) कपड्यातील नीटनेटकेपणा** **ड) व्यापारी वृत्ती**

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क, ड 3) फक्त अ, ब, क 4) सर्व

**प्र.4. वर्णनावरून व्यक्ती ओळखा:**

**– त्यांनी 'समाजस्वास्थ्य' नावाचे मासिक चालविले.**

**– त्यांनी 'मार्क्सवाद्यांची अफू' हा लेख 1942 साली लिहिला.**

**– एस.एम.जोशी यांनी उपोषणाचा मार्ग पत्करताच त्यांनी त्यास आक्षेप घेतला; कारण त्यांना खरे समाजवादी हे धार्मिक नसतात, असे वाटे.**

1) र. धों.कर्वे 2) धोंडो केशव कर्वे 3) विनोबा भावे 4) बेहरामजी मलबारी.

**प्र.5. जोतिराव फुले हे आपल्या रचनांना 'अखंड' म्हणत, तर कृष्णराव भालेकर हे आपल्या रचनांना ........ म्हणत.**

1) 'धांदांत' 2) 'श्रीखंड' 3) 'अभंग' 4) 'पाखंड'

**प्र.6. सत्यशोधकी चळवळीच्या अनुयायांपैकी राजर्षी शाहूंच्या आधी बहुजनांच्या शिक्षणाकरिता बोर्डिंगची स्थापना करणारे खालीलपैकी कोण ?**

1) जोतिबा फुले 2) नारायण मेघाजी लोखंडे 3) कृष्णराव भालेकर 4) डॉ.संतुजी रामजी लाड.

**प्र.7. खालीलपैकी कोणत्या घटना 1885 साली घडल्या ?**

**अ) पुण्यात सत्यशोधक चळवळीच्या झेंड्याची मिरवणूक**

**ब) 'बडोदावत्सल' वृत्तपत्राची स्थापना.**

**क) भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना.**

**ड) दीनबंधू सार्वजनिक सभेची स्थापना.**

1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, क,ड 3) फक्त अ, ब, ड 4) सर्व

**प्र.8.'असे म्हटले जाई की त्या गतजन्मी 'शुद्ध ब्राह्मण' होत्या; आणि त्यामुळे हिंदू शास्त्रांचे स्पष्टीकरण देण्यास योग्य होत्या.'**

**हे वर्णन लागू होणारी व्यक्ती खालीलपैकी कोणती ?**

1) ॲनी बेझंट 2) पंडिता रमाबाई 3) ताराबाई 4) जनाक्का शिंदे

**प्र.9. 'माझी साक्ष' हे खालीलपैकी कोणाचे आत्मचरित्र आहे ?**

1) गोपाळबाबा वलंगकर 2) जनाक्का शिंदे

3) रखमाबाई 4) पंडिता रमाबाई

**प्र.10.'देशाचे दुश्मन' या प्रत्युत्तरास कारणीभूत ठरलेली 'सत्यशोधक की ख्रिस्तसेवक' ही पुस्तिका कोणी लिहिली होती ?**

1) चिपळूणकर 2) श्रीधरपंत टिळक

3) गणपतराव नलावडे 4) न. चिं. केळकर

**प्र.11.ॲमस्टरडॅम येथील आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत 'हिंदुस्थानातील उदार धर्म' हा प्रबंध खालीलपैकी कोणी सादर केला होता ?**

1) वि. रा. शिंदे 2) वि. दा. सावरकर 3) महर्षी दयानंद 4) गोपाळकृष्ण गोखले

**प्र.12.'द प्रॉब्लेम ऑफ रूपी' हा प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालीलपैकी कोणत्या पदवीकरिता सादर केला होता ?**

1) एम. एम. सी 2) डॉक्टर ऑफ सायन्स

3) एम. फिल 4) यापैकी नाही.

**प्र.13. 5 सप्टेंबर 1919 रोजी बॉम्बे कौन्सिलात सादर केलेले 'पटेल बिल' हे कशाशी संबंधित होते ?**

1) तुकडेबंदी 2) संमतीवय 3) आंतरजातीय विवाह 4) विधवा पुनर्विवाह

**प्र.14.बौद्ध धम्माची दीक्षा घेत असताना डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना ........... प्रतिज्ञा दिल्या.**

1) सात 2) अकरा 3) एकवीस 4) बावीस

**प्र.15.सावरकारांच्या मते जातिव्यवस्था ही 'सप्तबंदी' वर आधारलेली होती. खालीलपैकी कोणती या सात बंद्यांपैकी एक नाही ?**

1) 'भोजन बंदी' 2) 'विवाह बंदी' 3) 'स्पर्श बंदी' 4) 'चिकित्सा बंदी'

**प्र.16.योग्य जोड्या ओळखा.**

**अ) भारत महिला परिषद – 1904**

**ब) ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स – 1927**

**क) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन – 1939**

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

**प्र.17.बरोबर विधाने ओळखा.**

**अ) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 1919 साली दुधगाव येथे 'रयत शिक्षण संस्थे'ची स्थापना केली.**

**ब) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'मुष्टिफंडा'ची कल्पना नेर्ले या ठिकाणी अंमलात आणली.**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही

# 4. गांधी युग – I : 1915–1935 – 1

**प्र.1.दिलेल्या विवरणावरून स्त्री ओळखा.**

**अ) महात्मा गांधी हे दुसरे येशु ख्रिस्त आहेत. या श्रद्धायुक्त भावनेने त्या गांधीजींना भेटण्यासाठी भारतात आल्या होत्या.**

**ब) गांधीजींनी त्यांना आपली कन्या मानून तिचे नामकरण केले होते.**

**क) हिंदुस्थानात इंग्रजी सत्तेने केलेल्या अत्याचाराची विशेषत: स्त्रियांवरील अन्यायाची, गांधीजीच्या अहिंसात्मक चळवळीची आणि सत्याग्रहाची माहिती त्यांनी जगभर प्रस्तुत केली.**

1) मिठूबेन पेटीट 2) मेरी कारपेंटर 3) मीराबेन 4) पेरीबेन कॅप्टन

**प्र.2. पहिल्या गोलमेज परिषदेच्या आधी सरकार आणि काँग्रेस यांच्यामध्ये मध्यस्थी करण्यास खालीलपैकी कोणास निवडले गेले होते ?**

**अ) पं. मदनमोहन मालवीय** **ब) तेजबहादूर सप्रू**

**क) एम. आर. जयकर**

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

**प्र.3. अ) कार्लाईल सर्क्युलर – स्वदेशी चळवळ**

**ब) कनिंगहॅम सर्क्युलर – ...............**

**‘अ’ मधील सहसंबंध विचारात घेऊन ‘ब’ मधील रिकाम्या जागी बसणारा योग्य पर्याय निवडा.**

1) असहकार चळवळ 2) सविनय कायदेभंग चळवळ

3) वैयक्तिक सत्याग्रह चळवळ 4) चलेजाव चळवळ

**प्र.4. खालीलपैकी कोणी सायमन कमिशनचा बहिष्कार करण्याची भूमिका घेतली होती ?**

**अ) लिबरल फेडरेशन** **ब) मुस्लीम लीग**

**क) इंडियन इंडस्ट्रियल अँड कमर्शियल काँग्रेस** **ड) हिंदू महासभा**

1) फक्त अ 2) फक्त अ, ब 3) फक्त अ, ब, क 4) सर्व

**प्र.5. दांडीचा सत्याग्रह करण्यासाठी गांधीजींनी 78 निवडक अनुयायांसह 12 मार्च 1930 रोजी प्रयाण केले; आणि ......... रोजी ते दांडी येथे पोहोचले.**

1) 4 एप्रिल 1930 2) 5 एप्रिल 1930 3) 6 एप्रिल 1930 4) 7 एप्रिल 1930

**प्र.6. शिरोडा येथे झालेल्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये खालीलपैकी कोणी सहभाग घेतला होता ?**

**अ) ब्रिजलाल बियाणी** **ब) यशोदाबाई आगरकर**

**क) धर्मानंद कोसंबी** **ड) दुर्गाबाई जोशी**

1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, क, ड 3) फक्त अ, क, ड 4) सर्व

**प्र.7. केशवराव जेधे हे सविनय कायदेभंगाच्या चळवळीदरम्यान 1930 साली तुरुंगात गेले. तेथे त्यांची ............. या गांधीवादी नेत्यांशी घनिष्ठ मैत्री झाली आणि त्यांचा काँग्रेसकडील ओढा वाढला.**

1) काकासाहेब गाडगीळ 2) काका कालेलकर 3) दादा धर्माधिकारी 4) महादेवभाई देसाई

**प्र.8. दुसऱ्या गोलमेज परिषदेदरम्यान इंग्लंडमध्ये राजकीय परिस्थिती खालीलपैकी कोणत्या स्वरूपाची होती ?**

**अ) सरकार हे पुराणमतवादी (conservative) पक्षाचे होते.**

**ब) पंतप्रधान हे मजूरपक्षाचे (labour party) होते.**

**क) कॅबिनेट हे पुराणमतवादी (conservative) पक्षाचे होते.**

1) फक्त अ, ब　　2) फक्त ब, क　　3) फक्त अ, क　　4) एकही बरोबर नाही.

**प्र.9. ............ या घटनेमुळे असहकार चळवळीला महात्मा गांधींनी स्थगिती दिली.**

1) जालियनवाला बाग हत्याकांड　　2) गांधी-आयर्विन करार

3) चौरीचौरा घटना　　4) रौलटविरोधी सत्याग्रह

**प्र.10.असहकार चळवळीच्या उत्तरार्धात 'झेंडा सत्याग्रह' लोकचळवळीचे एक महत्त्वाचे साधन झाले होते. काँग्रेस कार्यकारिणीने देशव्यापी झेंडा सत्याग्रहाची सूत्रे कोणाच्या हाती दिली होती ?**

**अ) सरदार वल्लभभाई पटेल**　　**ब) विठ्ठलभाई पटेल**

**क) मोतीलाल नेहरू**

1) फक्त अ, ब　　2) फक्त ब, क　　3) फक्त अ, क　　4) सर्व

**प्र.11.सविनय कायदेभंगाच्या चळवळीदरम्यान पेशावर येथे मोर्चेकऱ्यांवर गोळीबार करण्यास .......... रेजिमेंटच्या दोन तुकड्यांनी साफ नकार दिला होता.**

1) राजपूत　　2) गढवाली　　3) पठाण　　4) पंजाब

**प्र.12.1920 साली नागपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनादरम्यान खालीलपैकी काय झाले ?**

**अ) काँग्रेसची नवीन घटना मंजूर झाली.**

**ब) एका वर्षात 'स्वराज्य' हे ध्येय ठरविण्यात आले.**

**क) काँग्रेसची सदस्यत्व फी वाढविण्यात आली, जेणेकरून चळवळीचा खर्च भागेल.**

1) फक्त अ, ब　　2) फक्त ब, क　　3) फक्त अ, क　　4) सर्व

**प्र.13.गांधीजी गोलमेज परिषदेकरिता लंडनला रवाना होत असताना त्यांना उद्देशून खालील उद्गार कोणी काढले ?**

**''बापू, तुम्हाला हा विषाचा अखेरचा प्यालाही प्यावाच लागेल!''**

1) जवाहरलाल नेहरू　　2) मौलाना आझाद　　3) महादेवभाई देसाई　　4) यापैकी नाही.

**प्र.14. 1925 आणि 1926 मध्ये 'नवयुग' साप्ताहिकात लेख लिहून कोकणासाठी 'कोकण रेल्वे' ची मागणी खालीलपैकी कोणी केली ?**

1) सी. के. बोले　　2) प्रबोधनकार ठाकरे　　3) भास्करराव जाधव　　4) साने गुरुजी

**प्र.15.अहिंसा आणि सत्य या तत्त्वांनी स्वातंत्र्यासाठी झगडण्यास भारतीय जनतेस सज्ज करणाऱ्या महात्मा गांधींचे विचार खालीलपैकी कोणत्या जागतिक नेत्यांना प्रभावित करून गेले ?**

**अ) यू. थांट**　　**ब) लेक वॉलेसा**　　**क) जोसेफ स्टॅलिन**　　**ड) सन्-यत्-सेन**

1) फक्त अ　　2) फक्त अ आणि ब

3) फक्त अ, ब आणि क　　4) सर्व अ, ब, क आणि ड

# 6. क्रांतिकारी गट – 1

**प्र.1. 'आय.एन.ए.ट्रायल्स' च्या वेळी भारतभरात लोकप्रिय झालेली घोषणा म्हणजे –**
**''लाल किले से उठी आवाज –**
**...... , ....... और .......!''**
**रिकाम्या जागा भरणारा योग्य पर्याय ओळखा.**

1) धिल्लन, सहगल, शाहनवाज 2) सुभाष, मोहन, शाहनवाज
3) रास बिहारी, सुभाष, शाहनवाज 4) भुत्तो, पटेल, शाहनवाज

**प्र.2.वर्णनावरून व्यक्ती ओळखा.**
**– बालपणी त्यांनी '1857 चे स्वातंत्र्यसमर' आणि 'मॅझिनीचे चरित्र' ही सावरकरकृत पुस्तके तोंडपाठ केली.**
**– 1908 साली टिळकांना सहा वर्षांचा कारावास झाला, तेव्हा त्यांनी साखर खाणे सोडले.**
**– गांधीयुगात मात्र त्यांच्यावर गांधींचा प्रभाव वाढत गेला.**

1) सेनापती बापट 2) विनोबा भावे 3) न. चिं. केळकर 4) डॉ. राजेंद्र प्रसाद

**प्र.3. सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे मुख्यालय खालीलपैकी कोठे स्थापन केले ?**
**अ) सिंगापूर ब) रंगून क) मनिला ड) टोकिओ**

1) फक्त अ 2) फक्त अ, ब 3) फक्त ब, क 4) फक्त ड

**प्र.4. खालील जोड्यांमध्ये गटात न बसणाऱ्या व्यक्ती कोणत्या ?**
**अ) 'अनुशीलन समिती'– सतीशचंद्र बसु, बारींद्रकुमार घोष, नरेंद्र भट्टाचार्य**
**ब) 'युगांतर समिती' – भूपेंद्रनाथ दत्त, अविनाश भट्टाचार्य, अश्विनीकुमार दत्त.**

1) नरेंद्रकुमार भट्टाचार्य, अश्विनीकुमार दत्त 2) अश्विनीकुमार दत्त
3) नरेंद्रकुमार भट्टाचार्य 4) बारींद्रकुमार घोष, अविनाश भट्टाचार्य

**प्र.5. रँड खून खटल्यासंदर्भात टिळकांवर देशद्रोहाचा खटला दाखल झाला असता खालीलपैकी कोणत्या व्यक्तींनी टिळकांच्या सुटकेची मागणी करणारा अर्ज इंग्लंडच्या राणीच्या पाठवला होता ?**
**अ) प्रो. मॅक्समुल्लर ब) रोमेशचंद्र दत्त क) विल्यम हंटर ड) विल्यम वेडरबर्न**
**इ) सर रिचर्ड स्ट्रॅची**

1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, ड, इ 3) फक्त ब, क, ड 4) फक्त अ, ब, ड

**प्र.6. पुण्याचे कमिशनर रँडसाहेब यांच्या हत्येसाठी खालीलपैकी कोणास मृत्युदंडाची शिक्षा झाली ?**
**अ) वासुदेव चाफेकर ब) दामोदर चाफेकर क) बाळकृष्ण चाफेकर**

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) वरील सर्व

**प्र.7. 'त्यांना 'कर्नाटकचे सिंह' असे म्हटले जाई. त्यांच्या नेतृत्वाखाली बेळगाव येथे 1904 साली गुप्त संघटना स्थापन झाली होती'.**
**वर्णनावरून व्यक्ती ओळखा.**

1) डॉ. सिद्धनाथ काणे 2) नरहरपंत घारपुरे 3 ) गंगाधर देशपांडे 4) गोविंद नारायण पोतदार

**प्र.8. पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर गदर चळवळीच्या नेत्यांनी भारतातील पंजाबमध्ये लष्करी उठाव करण्याची योजना आखली होती. या योजनेचे नेतृत्व कोणाकडे देण्यात आले होते ?**

1) रासबिहारी बोस 2) विष्णू गणेश पिंगळे 3) लाला हरदयाळ 4) 1 आणि 2 दोन्ही.

**प्र.9. 2 ऑगस्ट 1954 रोजी 'आझाद गोमांतक' दलाच्या तरुणांनी सशस्त्र हल्ला करून दादरा आणि नगर हवेलीचा प्रदेश पोर्तुगीजांपासून मुक्त केला. या मोहिमेत खालीलपैकी कोण कोण सहभागी झाले होते ?**

**अ) विश्वनाथ लवंदे ब) राजाभाऊ वाकणकर क) सुधीर फडके ड) नानासाहेब काजरेकर**

1) फक्त अ 2) फक्त अ आणि ब 3) फक्त अ, ब आणि क 4) सर्व अ, ब, क आणि ड

**प्र.10. वर्णनावरून व्यक्ती ओळखा.**

**टिळकांची आणि त्यांची पहिली भेट एकमेकांसोबतच्या खडाजंगीने झाली. मात्र नंतर टिळकांचे एक अग्रगण्य अनुयायी म्हणून त्यांनी काम केले.**

1) लोकनायक अणे 2) दादासाहेब खापर्डे 3) न.चिं.केळकर 4) यापैकी नाही.

**प्र.11. 'झिमरमान प्लॅन' हा खालीलपैकी कोणत्या क्रांतिकारकाशी संबंधित आहे ?**

1) भूपेंद्रनाथ दत्त 2) वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय 3) लाला हरदयाळ 4) वरील सर्व.

**प्र.12. 'काकोरी कट' ही 9 ऑगस्ट रोजी घडवण्यात आलेली क्रांतिकारक कारवाई खालीलपैकी कोणत्या क्रांतिकारक संघटनेशी संबंधित होती ?**

1) 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' (HSRA)

2) 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' (HRA)

3) 'अनुशीलन समिती'

4) काकोरी कट ही कोणत्याही एका विशिष्ट संघटनेशी संबंधित कारवाई नव्हती.

**प्र.13. बर्लिनमध्ये 'भारत स्वातंत्र्य समिती' (India Independence League) ची स्थापना कोणी केली ?**

1) पी. मित्रा 2) श्यामजी कृष्ण वर्मा 3) लाला हरदयाळ 4) बारेंद्रकुमार घोष

**प्र.14. 'डॉन सोसायटी' (Dawn Society) ही संस्था भारतीय स्वातंत्र्य लढ्यात कोणत्या स्वरूपाचे कार्य करीत होती ?**

1) भारतीय वृत्तपत्रांची एक राजकीय स्वातंत्र्य जपण्यासाठीची संघटना म्हणून.

2) क्रांतिकारक संघटनांची गुप्त कार्ये पार पाडणारी संस्था म्हणून.

3) स्वदेशी नियंत्रणाखालील शिक्षणाची नवीन व्यवस्था तयार करू पाहणारी संस्था म्हणून.

4) भारतीय वकिलांची एक राजकीय संस्था म्हणून.

**प्र.15. वासुदेव बळवंत फडके यांच्याबाबत अयोग्य विधान निवडा.**

1) ते दत्त उपासक होते, तसेच त्यांनी 'दत्तमाहात्म्य' हा सात ओव्यांचा ग्रंथ लिहिला.

2) दौलतराव नाईकांच्या मदतीने शिरूर तालुक्यातील धामारी गावावर पहिला दरोडा घातला.

3) पुण्यामध्ये 1874 ला 'पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूट' ही शाळा सुरू करून स्वदेशीचा पुरस्कार केला.

4) बंगालच्या 'अमृतबझार' पत्रिकेने त्यांच्या अटकेनंतर लिहिलेल्या लेखात 'देशाप्रेमाणे ओथंबलेला हिमालयासारखा उत्तुंग महापुरुष' असा गौरवपूर्ण उल्लेख केला.

# 7. स्वातंत्र्योत्तर भारत – 1

**प्र.1. आण्णा भाऊ साठे यांनी 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' हा कधी रचला ?**

1) पहिल्या महायुद्धादरम्यान
2) दुसऱ्या महायुद्धादरम्यान
3) बोल्शेविक क्रांतीदरम्यान
4) 1924 साली स्टॅलिन सत्तेवर आल्यावर

**प्र.2. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्थापन झालेल्या कामगार संघटनांसंबंधी कोणत्या जोड्या योग्य आहेत ?**

**अ) 'इंटक' – सरदार पटेल**
**ब) 'कामगार आघाडी' – दत्ता सामंत**
**क) 'महाराष्ट्र लेबर युनियन' – राजन नायर**

1) फक्त अ, ब  2) फक्त ब, क  3) फक्त अ, क  4) सर्व

**प्र.3. 1953 साली डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. मात्र 1954 साली त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पक्षावरील वाढता प्रभाव हे कारण देऊन या पदाचा राजीनामा दिला. प्रस्तुत व्यक्ती कोण ?**

1) मौली चंद्र शर्मा  2) बलराज माधोक  3) दीनदयाळ उपाध्याय  4) पीतांबर दास

**प्र.4. भारतीय राज्यघटनेने निर्माण केलेले राष्ट्रपतिपद हे अधिक शक्तिशाली होऊन लोकशाही पद्धतीने निवडलेल्या सरकारवर हावी होण्याचा धोका 1951 साली लगेच समोर आला होता, परंतु संबंधित नेत्यांच्या समंजस भूमिकेमुळे हा पेच व्यवस्थितरित्या हाताळला गेला. हे कोणत्या संदर्भात घडले होते ?**

1) ए. के. गोपालन खटला
2) हिंदू कोड बिल
3) चंपकम् दोराईराजन् खटला
4) यापैकी नाही.

**प्र.5. योग्य जोड्या जुळवा.**

| **साहित्य** | **कोणत्या देशाकडून घेतले ?** |
|---|---|
| **अ) 'तुफानी' विमाने** | **1) रशिया** |
| **ब) 'फेअर चाईल्ड पॅकेट' जातीची विमाने** | **2) फ्रान्स** |
| **क) 'कॅनबेरा' विमाने** | **3) अमेरिका** |
| **ड) 'AN-12' हेलिकॉप्टर्स** | **4) इंग्लंड** |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 3 | 4 | 1 |
| 3) | 3 | 4 | 2 | 1 |
| 4) | 4 | 1 | 3 | 2 |

**प्र.6. स्वातंत्र्योत्तर काळात चलन तुटवड्यामुळे भारताची व्यापारस्थिती फारशी आशादायक नव्हती. या स्थितीमध्ये खालीलपैकी कोणत्या देशांनी आपली देणी रुपयामध्ये स्वीकारण्यास संमती दर्शवली ?**

**अ) सोव्हिएत रशिया  ब) अमेरिका  क) इंग्लंड**

1) फक्त अ  2) फक्त अ, ब  3) फक्त अ, क  4) सर्व